



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

अमृत सेवाभावी संस्था परभणी द्वारा संचलित

# कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार,

# कै. कमलाबाई बनमेरू कला,वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय लोणार,

# व

# पोलिस स्टेशन लोणार

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत

# ‘स्वंयसिध्दा’

मुली व स्त्री प्रशिक्षण शिबीर

१८ जानेवारी २०२० वार शनिवार

**संयोजक – डॉ. प्रकाश क. बनमेरू**

(प्राचार्य, कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार)

**समन्वयक– प्रा. कमलाकर के. वाव्हळ**

# प्रस्तावना

''ती आई आहे, ती ताई आहे
ती मैत्रीन आहे, ती पत्नी आहे
ती मुलगी आहे, ती जन्म आहे
ती माया आहे, तीच सुरवात आहे
आणि सुरवात नसेल तर बाकी सार व्यर्थ आहे......

''आजच्या युगात पुरूषाबरोबर स्त्रिया व मुली वेगवेगळया क्षेत्रात मोठया पदावर कार्यरत आहे. पण मानसिक शारिरीक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो सामाजीक असमानंता, कौटुंबीक हिंसा, अत्याचार आणि आर्थिक परावलंबीत्व यातुन स्त्रियांची संटका करून घेवयाची असेल तर गरज आहे महिला सक्षमिकरणाची घर संभाळण्याची जबाबदारी ही स्त्रियांकडेच जास्त असते तरीही समाजाकडुन त्यांना चांगली वागनुक मिळत नाही या अन्याय व अत्याचारा विरूध्द लढण्याची ताकद महिलांना मिळावी हया उददेशाने अमृत सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेच्या अध्यक्षा मा. सौ. उषा ता. गोले, सचिव डॉ. संतोष क. बनमेरू, विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांच्या संकल्पनतुन 'स्वयसिध्दा' हे महिला स्वसंरक्षण शिबीरकै. कमलाबाई बनमेरू कला,वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय लोणार येथे दि. १८ जानेवारी २०२० रोजी आयोजीत करण्यात आले. या शिबीरासाठी पोलिस स्टेशन लोणार यांचा ही हातभार लागला.

सदर शिबीर हे महिला व मुलींना शारिरीक, मानसीक, स्पर्धात्मक व आत्मीकदृष्टया सक्षम करण्यासाठी आयोजीत आला होता. या शिबीरामध्ये शारिरीक मजबुती साठी विविध प्रकारचे व्यायाम विविध प्रकारच्या कला शिकवुन हात लावणा—यांचे हात तोडण्याची क्षमता निर्माण करणे वाईट नजरेने बघणा—यांचे डोळे काढुन हातात ठेवण्याची धमक मानसीक शक्ती योण्यासाठी विविध योगासने यांचा अंर्तभाव होता. सदर प्रशिक्षण देण्यासाठी राजिव गांधी चॅमपियन शिप औरंगाबाद अंर्तगत मार्शलआर्ट जुडो कराटे द्वारा महिलांना मार्गदर्शन करण्यासाठी झी २४ तास सन्मान प्राप्त प्रशिक्षक प्रा. खिची लक्ष्मीकांत उपस्थित होते.

# उदघाटनसमारंभ

कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणारकै. कमलाबाई बनमेरू कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय लोणार, तसेच पोलिस स्टेशन लोणार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत महिला व स्त्रि संरक्षण शिबीर 'स्वयंसिध्दा' उदघाटन समारंभ दि. १८ जरनेवारी २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता कै. कमलाबाई बनमेरू कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयातील सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू सर तर उदघाटक म्हणुन अमृत सेवाभावी संस्था परभणी च्या अध्यक्षा मा. सौ. उषाताई गोले मॅडम लाभल्या होत्या प्रमुख अतिथी म्हणुन लोणार पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक मा. अजहर शेख तालंका महिला बचतगट अधिकारी सौ. सुनंदा करडेल व कार्यक्रमाचे मार्गदर्शन तथा प्रशिक्षक प्रा. लक्ष्मीकांत खिची व श्री अशिष खिची उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरवात प्रतीमा पुजन व दिपप्रज्वलन करून करण्यात आली कार्यक्रमाचे उदघाटक मा. सौ. उषाताई गोले मॅडम यांनी आपल्या उदघाटनीय भाषनातुन 'स्वयसिध्दा' कार्यक्रमाची आजच्या काळातील गरज स्पष्ट केली त्यांनी महाभारतातील द्रौपदीचा प्रसंग सांगुन आजच्या काळातील मुली व स्त्रियांना अन्याय व अत्याचारा पासुन स्वरक्षण करण्याचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

सौ. सुनंदा करडेल मॅडम यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातुन प्राचिन काळापासुन स्त्रियांची होत असलेली अडवुन विविध बंधने जसे हातातील बांगडया गळयातील मंगळसुत्र इत्यादी फक्त स्त्रियांवर कशाप्रकारे लादल्या गेल्या यावर भाष्य केले तसेच महिलांना स्वसंरक्षण करता आले नाहीतर त्यांच्यावर होणार अन्याय अत्याचार वाढतच जाईल असे सांगितले या स्वयंसिध्दा शिबीरातुन स्वरक्षणाचे धडे घेउन कोणत्याही प्रसंगात सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असे आवाहन केले.

यानंतर आपल्या अध्यक्षीय भाषणातुन प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांनी या मोफत शिबीराचा स्त्रियाव मुलींनी फायदा घेवुन एखादया वाईट प्रसंगी दोन हात करण्यास तत्पर रहाता यासाठी या शिबीराचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आल्याचे सांगीतले. निर्भया हत्याकांड, प्रियंका रेडडीहत्याकांड यासारखे उदाहरणे परत घडु नये त्यासाठी मुली व स्त्रियांनी आत्मरक्षणाचे कसब अंगी कारावे त्यांनी स्वयंसिध्दा सारख्या शिबीरातुन समाजासाठी महाविद्यालयाचे योगदान नेहमी प्रमाणे चालु राहील असे सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. कमलाकर वाव्हळ यानी केले.

# प्रशिक्षण

उदघाटन समारंभानंतर जुडो कराटे प्रशिक्षक प्रा. खिची लक्ष्मीकांत सर यांनी मुलींना व महीलांना सक्षम होण्याची गरज स्पष्ट केली व जुडो कराटे सारख्या कौशल्याचा उगम भारतात झाल्याचे सांगीतले. यानंतर त्यानी उपस्थिताना स्वरक्षणाचे धडे दिले. त्यामध्ये मुलींना व महीलांना त्यांचा कोणी एक हात धरल्यास, दोन हात धरल्यास, खांदयावर हात ठेवल्यास तसेच चाकु घेवुन कोणी वार करण्यास आल्यास प्रसंगवधान ठेवुन कशाप्रकारे बचाव करावा हे त्यांनी त्यांच्या सहका—याच्या मदतीने दाखवुन दिले. त्यांनी या प्रशिक्षणाबरोबर कंबर पाठ दुखणे , मानसीक व शारिरीक अजार यापासुन सुटका मिळवण्यासाठी आवश्यक योगासने यांची माहीती दिली. महिलांना त्यांच्यावर होणा—या अत्याचारातुन बचाव करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. दुस—या सत्रात महाविद्यालयाच्या मैदानात मुलींनकडुन त्यांनी शिकवलेल्या विविध कौशल्याचा सराव करून घेतला

## निरोप समारंभ

या एक दिवसीय महिला स्वरक्षण शिबीर स्वयंसिध्दा मध्ये कै. कमलाबाई बनमेरू कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय लोणार ,कै. कु. दुर्गाक. बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार, श्री शिवाजी हायस्कुल लोणार, डॉ. झाकीर हुसेन महा. लोणार, सरदार वल्लभभाई पटेलहायस्कुल लोणार, महाराणा प्रताप हायस्कुल लोणार, वर्ल्ड स्कुल लोणार येथिल विद्यार्थीनी, शिक्षीका तसेच महीला बचत गट लोणार येथिल महिला यांनी सहभाग नोंदवला. सर्व सहभागी विद्यार्थीनी व महिला यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अमृत सेवाभावी संस्था परभणी च्या अध्यक्षा मा. सौ. उषाताई गोले मॅडम ,प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू सर, प्रशिक्षक प्रा. लक्ष्मीकांत खिची उपस्थित होते. या शिबीराच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.


देशोन्नती

बनमेरू विज्ञान महाविद्यालयात स्वयंसिध्दा कार्यशाळा

लोणार ▪ शहर प्रतिनिधी

Principal
प्राचार्य
Late. Ku. Durga K. Banmeru Science College
LONAR, Dist.Buldhana